प्रेसनोट                                                  दिनांक १७/०५/२०१९

**आलोसे सचिन भगवान बोटुळे वय – ३४ वर्षे व्यवसाय शासकीय नोकरी, पद तलाठी सजा शिरोळ वांजरवाडा, नेमणुक तहसील कार्यालय, निलंगा जि. लातूर, रा. नवीन रेणापुर नाका, अंबाजोगाई रोड, लातूर यांनी २५००/–रुपये लाचेची मागणी करुन ती स्वत: स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

दिनांक १७/०५/२०१९ रोजी यातील तक्रारदार यांचे आईचे नावे मौजे शिरोळ (वांजरवाडा) येथील गट नं. मधील खरेदी केलेल्या जमीनीचा केलेल्या फेरचे बक्षीस म्हणुन २५००/– रुपये लाचेची मागणी केलेली आहे अशी तक्रार प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनूषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर कार्यालयाकडून दिनांक १७/०५/२०१९ रोजी ब्रीज हॉटेलचे पार्कींग समोर पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता आलोसे सचिन भगवान बोटुळे, तलाठी यांनी तक्रारदार यांचे आईचे नावे मौजे शिरोळ (वांजरवाडा) येथील गट नं. १५९ मधील खरेदी केलेल्या जमीनीचा केलेल्या फेरचे बक्षीस म्हणुन २५००/– रुपये लाचेची मागणी केल्याचे निषपन्न झाले.

आज १७/०५/२०१९ रोजी लोकसेवक तलाठी बोटुळे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम तक्रारदार यांना देण्यास पाठविले असता शिवाजी चौक लातूर येथील ब्रीज हॉटेलच्या समोरील पार्कींग मध्ये लोकसेवक तलाठी बोटुळे यांनी पंचासमक्ष लाचेची रक्कम २५००/–रुपये स्वत: स्विकारली वरुन त्यांचे विरूध्द पोलीस ठाणे शिवाजी नगर, लातूर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम (संशोधन) २०१८ अन्वये गुंन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालू आहे.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री. संजय लाटकर, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती अर्चना पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक वर्षा दंडीमे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, पोह/देशमुख, पोना/डांगे, सुरवसे, मपोना/शेळके, पोकॉ/भोंग, गुंडरे, धारेकर, सुडे, विभुते, स्वामी चापोना/महाजन यांनी पार पाडली आहे.

**तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात** येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी **लाचेची मागणी करीत असल्यास तसेच** त्यांचे लाचेच्या मागणीसंदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) **यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ** क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्सास किंवा माहीती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) मा.श्री.संजय लाटकर पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड. मोबाईल क्रमांक ९९२३०२८१२२
२) माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक :– मोबाईल क्रमांक ९९२३६६६६४४
३) पोलीस निरीक्षक वर्षा दंडीमे :– मोबाईल क्रमांक ९४२२२४२०८०
४) पोलीस निरीक्षक कुमार दराडे :– मोबाईल क्रमांक ९६५७७०९८४१
५) टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक :– १०६४
६) कार्यालयाचा फोन क्रमांक :– ०२४८२–२४२६७४७
७) Website :– www.acbmaharashtra.gov.in
८) Mobile App :– www.acbmaharashtra.net
९) Facebook Page :– www.facebook.com/MaharashtraACB

पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

( माणीक बेद्रे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned by CamScanner